# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः14.12.2024** **वारःशनिवार**

---

1. प्रयागराज इथे 6 हजार 670 कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांचा पंतप्रधानांच्या हस्ते शुभारंभ
2. भारतीय राज्यघटनेच्या 75 वर्षांच्या प्रवासावर कालपासून लोकसभेत विशेष चर्चेला सुरुवात
3. पंतप्रधान मातृवंदना योजनेच्या 3 कोटी 64 लाख लाभार्थ्यांना 18 हजार 854 कोटी रुपये वितरित
4. भारत आणि संयुक्त अरब अमिराती दरम्यान संरक्षण क्षेत्र आणि सुरक्षा सहकार्य वाढवण्याची गरज-डॉ. एस. जयशंकर आणि
5. वायव्य आणि मध्य भारतात थंडीची लाट येण्याची शक्यता

**महाकुंभ**

महाकुंभ 2025 हा एकता-समतेचा महायज्ञ ठरेल, देशाला मार्गदर्शन करेल आणि त्याची सर्वत्र चर्चा होईल असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. 13 जानेवारी 2025 पासून अधिकृतपणे सुरू होणाऱ्या महाकुंभ-2025 चं औपचारिक उद्घाटन केल्यानंतर ते प्रयागराज संगम परिसरात एका मेळाव्यात बोलत होते. या प्रसंगी, त्यांनी सुमारे 6 हजार 670 कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांचा शुभारंभ केला, यात प्रयागराजमधल्या पायाभूत सुविधांना चालना देण्यासाठी आणि अखंड संपर्क प्रस्थापित करण्यासाठी अनेक रेल्वे आणि रस्ते प्रकल्पांचा समावेश आहे. आपलं सरकार संस्कृती आणि वारसा समृद्ध करण्यासाठी काम करत असल्याचं ते म्हणाले. यावेळी पंतप्रधानांनी काही प्रमुख मंदिर परिसरांचं उद्घाटनही केलं.

**लोकसभा चर्चा**

भारतीय राज्यघटनेच्या 75 वर्षांच्या गौरवशाली प्रवासावर काल लोकसभेत विशेष चर्चेला सुरुवात झाली. सुरुवातीला संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी भारतीय संविधान सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक जीवनातील सर्व पैलूंना स्पर्श करून राष्ट्र उभारणीचा मार्ग खुला केल्याचं सांगितलं. संविधान ही देशाच्या सभ्यतेच्या मूल्यांची अभिव्यक्ती असल्याचं ते म्हणाले. गेल्या काही वर्षांत संविधानाला एका विशिष्ट पक्षाचं योगदान म्हणून सादर करण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र संविधान हे कोणत्याही एका पक्षाचं योगदान नसून भारताच्या मूल्यांशी सुसंगत असा अतुलनीय, परिवर्तनकारी दस्तऐवज असल्याचं विरोधी काँग्रेसला उद्देशून त्यांनी सांगितलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी आह या चर्चेला उत्तर देतील. चर्चेत भाग घेताना काँग्रेसच्या प्रियांका गांधी वाड्रा यांनी संविधान हे नागरिकांना सुरक्षित ठेवण्यासाठी सुरक्षा कवच असून ते न्याय, एकता आणि अभिव्यक्तीच्या अधिकाराचंही कवच असल्याचं सांगितलं. संविधानामुळे भारत विकासाच्या मार्गावर सातत्याने मार्गक्रमण करत असल्याचं राष्ट्रवादी काँग्रेसचे डॉ अमोल कोल्हे यांनी सांगितलं.

**राज्यसभा**

राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड यांच्याविरोधातील अविश्वास ठरावाच्या मुद्द्यावरून सत्ताधारी आणि विरोधी सदस्यांमध्ये झालेल्या जोरदार शाब्दिक चकमकीनंतर राज्यसभेचं कामकाज काल दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील विरोधकांनी हा प्रस्ताव आणला होता. आपल्या कार्यकाळात तसंच गेल्या तीस वर्षांत अध्यक्षांविरुद्ध किती नोटिसा आल्या याचा विचार सभागृहाने करण्याचं आवाहन धनखड यांनी केलं.

**मातृवंदना**

2017 पासून पंतप्रधान मातृवंदना योजनेच्या 3 कोटी 64 लाख लाभार्थ्यांना 18 हजार 854 कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत. लोकसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना महिला आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी काल ही माहिती दिली. या योजनेतील लाभार्थ्यांच्या कागदविरहित नोंदणीसाठी सरकारने अनेक योजना सुरू केल्या असल्याचं त्यांनी सांगितलं.

**क्षयरोग**

2025 पर्यंत टीबी म्हणजेच क्षयरोग नष्ट करण्याचं लक्ष्य ठेवलं असून राष्ट्रीय धोरण अंमलबजावणीमुळे क्षयरोगाच्या प्रकरणांमध्ये झपाट्यानं घट झाल्याचं केंद्र सरकारनं म्हटलं आहे. लोकसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना, आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री, अनुप्रिया पटेल यांनी देशभरातील क्षयरोगाचं प्रमाण 2015 मधील एक लाख लोकसंख्येमागे 237 रुग्ण या संख्येवरुन 2023 मध्ये 195 प्रति लाख म्हणजेच 17 टक्क्यांच्या खाली आल्याचं सांगितलं.

**आरोग्य मंदिर**

या महिन्याच्या 10 तारखेपर्यंत देशभरात एकूण 1 लाख 75 हजारांहून अधिक आयुष्मान आरोग्य मंदिरं सुरू करण्यात आली आहेत. अशी माहितीही आणखी एका प्रश्नाला उत्तर देताना अनुप्रिया पटेल यांनी दिली.

**अवयवदान**

मोठ्या प्रमाणावर आयोजित करण्यात आलेल्या जनजागृती मोहिमा आणि विविध उपक्रमांमुळे देशात अवयवदान, अवयव प्रत्यारोपण आणि ऊती दानांची संख्या वाढत आहे. लोकसभेत एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात, आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री, प्रतापराव जाधव यांनी माहिती दिली की 2023 मध्ये 18 हजार हून अधिक अवयव प्रत्यारोपण आणि 16 हजारपेक्षा जास्त नागरिकांचं अवयव दान नोंदवलं गेलं. 2018 मध्ये एकंदर 7 हजार अवयव प्रत्यारोपण आणि 6 हजार 294 अवयव दान झालं होतं.

**जलमार्ग**

अंतर्देशीय जलमार्गांद्वारे मालवाहतूक क्षमता सध्या 133 दशलक्ष मेट्रिक टन झाली असल्याची माहिती केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री, सर्बानंद सोनोवाल यांनी लोकसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या 10 वर्षांत या क्षेत्रात मोठी गुंतवणूक आल्याचं त्यांनी सांगितलं.

**भारत-संयुक्त-अरब-अमिराती**

भारत आणि संयुक्त अरब अमिराती दरम्यान संरक्षण क्षेत्र आणि सुरक्षा सहकार्य वाढवण्याची गरज असल्याचं प्रतिपादन परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी काल नवी दिल्ली इथं केलं. संयुक्त अरब अमिरातीचे परराष्ट्र व्यवहार मंत्री शेख अब्दुल्ला बिन झायेद बिन अल नाह्यान यांच्यासोबत झालेल्या 15 व्या भारत-UAE संयुक्त आयोगाच्या बैठकीत डॉ. जयशंकर बोलत होते. एकात्मिक आर्थिक भागीदारीमुळे दोनही देशांचा व्यापार 85 बिलीअन डॉलर्सवर गेला आहे. दोनही देशांदरम्यानचं स्थैर्य, सुरक्षा आणि समृद्धी जपणं हे दोनही देशांच्या समृध्दीसाठी आवश्यक असल्याचंही ते म्हणाले.

**राजदूत-भेट**

परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी काल नवी दिल्लीत अनेक देशांच्या राजदूतांसोबत बैठका घेतल्या. त्यांनी जपानचे भारतातील राजदूत ओनो केइची, बेलारूसचे राजदूत मिखाईल कास्को, आर्मेनियाचे राजदूत वहागन अफयान यांचीही भेट घेतली. आणि या देशांदरम्यान दीर्घकालीन सहकार्य अधिक दृढ करण्यावर यावेळी चर्चा केली.

**कॅनडा**

कॅनडामध्ये गेल्या आठवड्यात 3 भारतीय विद्यार्थ्यांची हत्या झाल्याबद्दल भारतानं कॅनडाच्या प्रशासनाकडे तीव्र चिंता व्यक्त केली आहे, दोषींवर कारवाईसाठी सखोल चौकशी व्हावी अशी मागणी भारत सरकारनं केल्याची माहिती परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी काल नवी दिल्लीत पत्रकारांना दिली. कॅनडामध्ये सध्या सुरु असलेलं द्वेषपूर्ण वातावरण, गुन्हे आणि हिंसाचार या सर्वांपासून सावध राहण्याचा इशारा भारतीय नागरिकांना दिला असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**श्रीलंका**

श्रीलंकेच्या राष्ट्रपती अनुरा कुमारा दिसानायके उद्यापासून भारत दौऱ्यावर येणार आहेत. अध्यक्षपदी निवडून आल्यानंतर दिसानायके यांची ही पहिलीच भारत भेट आहे. त्यांच्या तीन दिवसंच्या दौऱ्यात ते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतील आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी द्विपक्षीय, प्रादेशिक आणि परस्पर हितसंबंधांच्या आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवर चर्चा करतील.

**संरक्षण मंत्रालय कार्यशाळा**

IDS अर्थात इंटिग्रेटेड डिफेन्स स्टाफ मुख्यालयाने काल आयसी चिप उत्पादनात भारताला आत्मनिर्भर बनवण्यासाठी एका कार्यशाळेचं आयोजन केलं होतं. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय, शैक्षणिक आणि खाजगी उद्योगांसह संरक्षण मंत्रालयाच्या विविध विभागातील तज्ज्ञ यात सहभागी झाले होते.

**गडकरी एक्सप्रेसवे**

दिल्ली-डेहराडून द्रुत-गती मार्गाच्या पूर्ण झालेल्या टप्प्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते येत्या 15 ते 20 दिवसांत उद्घाटन होणार असल्याची माहिती रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिली आहे. या द्रुतगती महामार्गामुळे दिल्ली डेहराडून या दोन्ही शहरांमधील अंतर अडीच तासांपर्यंत कमी होण्यासाठी मदत होईल असं गडकरी यांनी सांगितलं.

**सुदान**

सुदानमधल्या उत्तर दारफुर राज्यात राजधानी एल फाशरमध्ये काल निमलष्करी बंडखोर आरएसएफ ने केलेल्या गोळीबारात किमान 45 नागरिक ठार तर 28 जण जखमी झाले.

**क्रिकेट**

भारत आणि ऑस्ट्रेलिया संघांदरम्यान, बॉर्डर गावस्कर करंडक क्रिकेट कसोटी मालिकेत ब्रिस्बेन इथं आज सुरु झालेल्या तिसऱ्या सामन्यात भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. पावसामुळे सामना थांबला असून आतापर्यंत ऑस्ट्रेलियाच्या 28 धावा झाल्या आहेत. दोन्ही संघांनी पाच सामन्यांच्या या मालिकेतला एकेक सामना जिंकला आहे.

**हवामान**

देशाच्या मध्य आणि वायव्य भागात पुढील दोन दिवस थंडीची लाट येण्याची शक्यता हवामान विभागानंवर्तवली आहे. पश्चिमेकडील वातावरण बदलामुळे तापमानात घट होईल अशी माहिती हवामान विभागाच्या डॉ सोमा सेन रॉय यांनी दिली.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.